| | |
|---|---|
| दाखल तारीख | २९.०७.२००० |
| नोंदणी तारीख | २९.०७.२००० |
| निकाल तारीख | १६.०३.२०२६ |
| कालावधी | वर्ष महिना दिवस |
| | **२५ ०७ १७** |

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(**पीठासीन अधिकारी एम. एम. गादिया**)

**नियमित फौजदारी खटला क्र.१२४/२०००.**

**CNR No. MHKO030000242000.** **निशाणी क्र.९४/ब.**

**गुन्हा क्रमांक ६३/२०००.**

**महाराष्ट्र शासन तर्फे शाहूपुरी**
**पोलीस ठाणे, कोल्हापूर.** .. **अभियोग पक्ष**

***विरुध्द***

१. **बाळासो पांडूरंग जाधव,(मयत)**

२. **अमीत अशोक जाधव,(फरार)**
वय ४५ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. सदर बझार, शाहू कॉलेजचे पाठीमागे,
कोल्हापूर.

३. **अनिल मधुकर हेगडे,(फरार)**
वय ४३ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. सदर बझार, शाहू कॉलेजचे पाठीमागे,
कोल्हापूर.

४. **गफूर अल्लाबक्ष शिकलगार,(फरार)**
वय ४५ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. सदर बझार, शाहू कॉलेजचे पाठीमागे,
कोल्हापूर.

५. **आनंदा शिवराम गिरी,(फरार)**
वय ४६ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. सदर बझार, शाहू कॉलेजचे पाठीमागे,
कोल्हापूर.

६. **सौ. सुरेखा बाळासोा जाधव,**
वय ४५ वर्षे, धंदा – मजुरी, **..आरोपी**
रा. सदर बझार, शाहू कॉलेजचे पाठीमागे,
कोल्हापूर.

..............................................................................................

अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता – श्री. ए. एन. डोईफोडे.
आरोपी क्र.६ तर्फे विधीज्ञ – श्री. ए. एस. खोतलांडे.

..............................................................................................

## न्यायनिर्णय

( दिनांक १६.०३.२०२६ )

प्रस्तुत खटल्यात भारतीय दंड संहीता, १८६० मधील कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ४२७, ५०४, व ५०६, सह कलम १४९ खालील गुन्ह्यांसाठी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

**०२.**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की, मयत फिर्यादी नामे सुधा पंडितराव जामसांडे ही तीचा मुलगा मयत विजय व मुली सुरेखा तसेच लक्ष्मी असे

मार्च–२००० मध्ये कोल्हापूर येथील बाबुभाई परीख पुलासमोरील न.भु.क्र. ११२४/ई या जागेत रहावयास होते. सदर मिळकत मयत राधाबाई कृष्णराव चव्हाण या मुळ मालक महीलेने मयत फिर्यादीस मृत्यूपत्राने दिलेली होती. सदर जागेबाबत न्यायालयात दिवाणी वाद प्रलंबीत आहेत. दिनांक ०७.०२.२००० रोजी रात्री ०८.०० चे सुमारास, फिर्यादी ही घरी असताना, तीस घराबाहेर पुढील व पश्चिम दरवाजासमोर लाईट ट्युबा फोडण्याचा तसेच लोखंडी हत्यारानेही ठोकण्याचा आवाज ऐकू आला. म्हणून तीने खिडकीतुन पाहीले असता, आरोपी हे तीच्या जागेच्या लोखंडी कुंपणावरुन तीच्या जागेत येत असल्याचे दिसले. म्हणून तीने ओरडाओरड केली. सदर आरोपींपैकी एक आरोपी पश्चिमेकडील दरवाजाची कडी मोडून घरात आला, व तो तीस म्हातारे बाहेर जा नाही तर ठार मारेन, असे म्हणून त्याने तीच्या घरातील सामान विस्कटून टाकले. त्यावेळी सदर इसमाने मयत फिर्यादी व तीचा मुलगा मयत विजय यांना कानफाडात मारल्या. सदर इसमासोबत असणा–या इतर इसमाने तीच्या घराबाहेरील बल्ब फोडला. त्यानंतर ओरडाओरड झाल्यामुळे व लोक जमल्यामुळे, सदर सर्व लोक पळून गेले. म्हणून मयत फिर्यादीने दिनांक ०८.०३.२००० रोजी शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपींविरुध्द गुन्हा क्र.२६/२००० ने गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान, घटनेत आरोपींचा समावेश असल्याचे स्पष्ट झाल्याने, त्यांना अटक करण्यात येवुन, तपासांती, त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०३.**खटला प्रलंबीत असताना, आरोपी क्र.२ ते ५ हे फरार झाल्याने माझ्या विव्दान पुर्वाधिका–यांनी आरोपी क्र.१ व ६ यांचेविरुध्द दोषारोप (नि.४१ व ७५) तयार केला. सदर दोषारोपातील सर्व मजकूर सदर आरोपींना त्यांच्या मायबोलीत वाचून व समजावुन सांगण्यात आला असता, त्यांनी गुन्हा नाकबुल केला व चौकशीची मागणी केली. चौकशीदरम्यान, आरोपी क्र.१ हा मयत झाल्यामुळे,

त्याच्याविरुध्दचा अभियोग रद्द करण्यात आला. बचावादरम्यान, आरोपी क्र.६ हीने अभियोगपक्षाची सर्व हकिकत नाकारुन तीस खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आल्याचे नमूद केले आहे.

**०४.**वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी क्र.६ ही इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाची सदस्या होती, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| २. | आरोपी क्र.६ हीने इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाचे उद्दिष्ट पुर्तीसाठी बलप्रयोग व हिंसाचार केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ३. | आरोपी क्र.६ हीने इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाच्या उद्देशाच्या अमंलबजावणी दरम्यान फिर्यादीच्या जागेत व घरात फौजदारीपात्र गृहअतिक्रमण केले, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ४. | आरोपी क्र.६ हीने इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाच्या उद्देशाच्या अमंलबजावणी दरम्यान मयत फिर्यादी व मयत विजय यांना इच्छापूर्वक दुखापत केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ५. | आरोपी क्र.६ हीने इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाच्या उद्देशाच्या अमंलबजावणी दरम्यान फिर्यादीच्या घरातील वस्तुंचे नुकसान करुन आगळीक केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ६. | आरोपी क्र.६ हीने इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाच्या उद्देशाच्या अमंलबजावणी दरम्यान मयत फिर्यादी व तीच्या मुलांना अपशब्द वापरुन फौजदारीपात्र धाकधपटशा दिला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ७. | आरोपी क्र.६ हीने इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाच्या उद्देशाच्या अमंलबजावणी दरम्यान मयत फिर्यादी व तीच्या मुलांना जीवे मारणेची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकधपटशा दिला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ८. | काय आदेश ? | **...आरोपी क्र.६ हीस निर्दोष मुक्त करण्यात आलेले आहे, तर फरार आरोपी क्र. २ ते ५ यांना दोषमुक्त करण्यात आले आहे.** |

## कारणमीमांसा

**०५.**दोन्ही बाजुच्या विव्दान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. हकिकतीच्या पुष्टर्थ, अभियोगपक्षाने केवळ राजलक्ष्मी(अ.सा.१) हीची साक्ष(नि.८५) घेतलेली आहे. अभियोगपक्षाने दिनांक ०८.०३.२००० रोजीच्या फिर्यादीचा(नि.८६) आधार घेतलेला आहे.

**वादप्रश्न क्र.१ ते ७ करिता,**

**०६.**सदर वादप्रश्न हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, सदर वादप्रश्नांचे विश्लेषण सोईसाठी एकत्रीतपणे करण्यात येत आहे. जखमी फिर्यादी व तीचा जखमी मुलगा विजय हे मयत आहेत, याबाबत वाद नाही. राजलक्ष्मी(अ.सा.१) या मयत फिर्यादीच्या मुलीने आपल्या साक्षीत(नि.८५) असे नमूद केले आहे की, फिर्यादी ही दिनांक ११.०४.२०२२ रोजी मयत झालेली आहे, तर तीचा भाऊ विजय हा दिनांक २०.०७.२०१७ रोजी मयत झालेला आहे. एका मिळकतीबाबत आरोपी व मयत फिर्यादी यांच्यादरम्यान दिवाणी वाद प्रलंबीत होते. दिनांक ०७.०२.२००० रोजी रात्री ०९.३० चे सुमारास, मयत फिर्यादी व तीच्यासह तीचे बहीण–भाऊ घरी होते. त्यावेळी आरोपींनी तीच्या घराचा दरवाजा फोडला. त्यावेळी आरोपींनी आपल्यासोबत बरेच साहीत्य आणलेले होते व ते आपल्या घरात ठेवणार होते. म्हातारे कब्जा सोडून जा, नाही तर ठार मारीन, अशी धमकी आरोपींनी मयत फिर्यादीस दिली. त्यावेळी आरोपींनी मयत विजय याच्या थोबाडीत मारली. सदर साक्षीदाराने दिनांक ०८.०२.२००० रोजीच्या फिर्यादवरील(नि.८६) मयत फिर्यादीची सही ओळखलेली आहे. तीने आपल्या उलटतपासात असे नमूद केले आहे की, मयत फिर्यादीने अनोळखी इसमांविरुध्द फिर्याद दिलेली होती. तीस घटनेच्या संबंधीत काळात आरोपींची नांवे माहीत नव्हती.

**०७.**राजलक्ष्मी(अ.सा.१) तीने आपल्या साक्षीत(नि.८५) ज्या मिळकतीबाबत मयत फिर्यादी व आरोपी यांचेदरम्यान वाद होता, तीचे कोणतेही वर्णन नमूद केलेले नाही. फिर्याद(नि.८६) ही अनोळखी इसमाविरुध्द देण्यात आलेली होती. कथीत घटना रात्रीच्या वेळी घडलेली होती. सदर साक्षीदाराने आपल्या साक्षीत मोघमपणे घटना आरोपींनी घडवलेली होती, असे नमूद केले आहे, परंतु तीने घटनेत आरोपींचा समावेश होता, याबाबत तपशिलवार कथन केलेले नाही. घटनेत कोणत्या आरोपीने काय भुमिका निभावली, याबाबत तीने तपशिलवार कथन केलेले नाही. आरोपींनी त्यांच्यासोबत काय साहीत्य आणलेले होते, तसेच कोणत्या आरोपीने मयत फिर्यादीस जागा सोडून जाणेबाबत जिवे मारणेची धमकी दिली, याबाबतही तीने तपशिलवार कथन केलेले नाही. घटना ही रात्री ०९.३० चे दरम्यान घडलेली असताना, प्रकाशाची काय सुविधा होती व त्यामुळे घटनेतील आरोपींना ओळखता येणे शक्य होते, याबाबतही तीने काहीही आपल्या साक्षीत नमूद केलेले नाही. मुख्यतः जखमी फिर्यादी व जखमी विजय हे मयत असल्यामुळे त्यांच्या साक्षी झालेल्या नाहीत.

**०८.**कथीत घटना दिनांक ०७.०२.२००० रोजी रात्री ०९.३० च्या सुमारास घडलेली असताना, फिर्याद ही दिनांक ०८.०२.२००० रोजी सायं. ५.१५ चे सुमारास म्हणजे १९ तासांच्या विलंबाने दाखल करण्यात आलेली आहे व त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण न्यायालयासमोर आलेले नाही. अभियोगपक्षाने मयत फिर्यादीच्या घरातील वस्तुंच्या नुकसानीबाबत स्थळपंचनामा व इतर कोणताही पंचनामा शाबीत केलेला नाही. राजलक्ष्मी(अ.सा.१) या साक्षीदारानेही आपल्या साक्षीत(नि.८५) ज्या साहीत्याचे नुकसान झाले, त्या साहीत्याचे कोणतेही वर्णन नमूद केलेले नाही. एकंदरीतच घटनेबाबत अभियोगपक्षाने विश्वसनीय असा पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. परिणामतः आरोपी क्र.६ ही इतर आरोपींसोबत बेकायदेशीर जमावाची सदस्या होती, सदर जमावाच्या उद्देशाच्या

अमंलबजावणीदरम्यान तीने दंगा केला, मयत फिर्यादीच्या घरात गृहअतिक्रमण केले, तीस व मयत विजय यांना इच्छापुर्वक दुखापत केली, आगळीक केली, मयत फिर्यादी व तीच्या मुला मुलींना अपशब्द वापरले तसेच जीवे मारणेची धमकी देवुन धाकधपटशा दिला, हे योग्य संशयविरहीतपणे शाबीत झालेले नाही. म्हणून आरोपी क्र.६ विरुध्दचे दंड संहीतेतील कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ४२७, ५०४, व ५०६ सह कलम १४९ खालील गुन्हे शाबीत झालेले नाहीत. म्हणून वादप्रश्न क्र.१ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी असे आहेत.

**<u>वादप्रश्न क्र.८ बाबत</u> :–**

**०९.**मी वादप्रश्न क्र.१ ते ७ ला दिलेल्या नकारार्थी निष्कर्षांचा विचार करता, आरोपी क्र. ६ ही निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. फरार आरोपी क्र.२ ते ५ यांच्याविरुध्दही प्रथमदर्शनी असा पुरावा न्यायालयासमोर आलेला नसल्यामुळे, सदरचा जुना खटला सदर आरोपींविरुध्द प्रलंबीत ठेवुन कोणतीही फलनिष्पत्ती होणार नाही, म्हणून सदर आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः वादप्रश्न क्र.८ चे निष्कर्षादाखल, मी खालील आदेश पारित करित आहे,

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.६ हीस भारतीय दंड सहीता,१८६० चे कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ४२७, ५०४, व ५०६ सह कलम १४९ खालील गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) नुसार गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

२. आरोपी क्र.६ हीचे जामिनकतबे रद्द करण्यात येवुन, तीस स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे.

३. फरार आरोपी क्र.२ ते ५ यास भारतीय दंड संहीता, १८६० मधील कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ४२७, ५०४, ५०६ खालील गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ मधील कलम २३९ नुसार दोषमुक्त करण्यात आले आहे.

४. फरार आरोपी क्र.२ ते ५ यांचेविरुध्दचे अजामिनपात्र वॉरंट परत मागविणेत यावेत.

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.17 10:49:41 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः १६.०३.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

## **केसचा सारांश**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | ०७.०२.२००० |
| २. | प्रथम खबर | २७.०५.२००० |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | २९.०७.२००० |
| ४. | दोषारोप तारीख | २०.०१.२०२४ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | २८.०१.२०२६ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | .. |
| ७. | निकाल तारीख | १६.०३.२०२६. |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपी विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाळासो पांडूरंग जाधव (मयत) | .... | .... | भारतीय दंड संहीता, १८६० मधील कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ४२७, ५०४, ५०६ | कमी करण्यात आले. | .... | .... |

नि.९४

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | अमीत अशोक जाधव | २८.०२.२००० | .... | .....''.... | दोषमुक्त करण्यात आले. | .... | .... |
| ३ | अनिल मधुकर हेगडे | २६.०२.२००० | .... | .....''.... | दोषमुक्त करण्यात आले. | .... | .... |
| ४ | गफूर अल्लाबक्ष शिकलगार | २६.०२.२००० | .... | .....''.... | दोषमुक्त करण्यात आले. | .... | .... |
| ५ | आनंदा शिवराम गिरी | २६.०२.२००० | .... | .....''.... | दोषमुक्त करण्यात आले. | .... | .... |
| ६ | सुरेखा बाळासो जाधव | २८.०२.२००० | ०५.०६.२०१८ | .....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |

**<u>फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>**

**(अ) – <u>अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी</u> –**

| **अ.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | राजलक्ष्मी पंडितराव जामसांडेकर | फिर्यादी नि.८५ |

(ब) – बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) – न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक

**<u>फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक</u> –**

(अ) – अभियोग पक्षातर्फे निशाणी – निरंक

(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) – न्यायालयातर्फे निशाणी – निरंक

(ड) – भौतिक वस्तू – निरंक

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.17 10:49:48 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः १६.०३.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.